**Indian Streams Research Journal**
**Vol -1 , ISSUE –1, Feb - 2011**
**ISSN:-** 2230-7850

**ORIGINAL ARTICLE**

# महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक सबलीकरणाची वाटचाल

**अनिल माणिकराव बैसाणे**

इतिहास विभाग प्रमुख,
झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे.

## प्रस्तावना

बचतगट चळवळीमुळे महिलांच्या सबलीकरणास मदत होत आहे. बचत गटांच्या माध्यमातून बदलाची प्रक्रिया सुरू झाली आहे. ग्रामीण महिलांचे व मुलांचे आरोग्य संवर्धन, शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक उत्थन करण्याच्या हेतूने बचत गटाची चळवळ खूप महत्वाकांक्षी ठरली आहे. घरातील स्त्रीचा विकास झाला तर मुलांचा आणि घराचा खरा विकास होईल या प्रेरणेच बचत गटात महिला सहभागी होतात.

मोलमजुरी करणाऱ्या, शेतात राबणऱ्या, धुणी भांडी करणऱ्या, गरीब महिलांना बचतीची सवय लावण्यासाठी त्यांच्या आर्थिक अडीअडचणींच्या वेळी त्यांना उपयोगी पडावे या हेतूने बचत गट तयार करण्यात येतात. बचत गटांमुळे महिलांना बचतीची सवय लागली, सहकार्याची भावना वाढली, घराबाहेर पडण्याचे धाडस वाढले, आत्मविश्वास वाढला, घरबसल्या व्यवसाय करता आला, उत्पन्न वाढले, घरातही मानाचे स्थान मिळवता आले, पैशामुळे मुलांना शिक्षण देता आले, महिलांना प्रात्साहन मिळाले, सामाजिक कार्यात सहभाग वाढला.

थोडक्यात, बचत गटात आल्यामुळे महिलांवरील सामाजिक बंधने हळूहळू कमी होऊ लागली. महिलांना कर्ज मिळू लागले, व्यवसाय करता येऊ लागला. कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पेलण्याची क्षमता वाढू लागली. म्हणजे महिलांच्या सबलीकरणस मदत होऊ लागली आहे.

## महिलांचे आर्थिक सबलीकरण

बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सबलीकरण होते. स्त्रियांच्या कामाला महत्त्वाचे मानल्यास त्यांच्या कामाचा, त्यागाचा विचार केल्यास सबलीकरणास सुरूवात होईल. महिलांमध्ये बचत गटांमुळे आत्मविश्वास निर्माण होतो, धाडस निर्माण होते, निर्णयक्षमता वाढते, महिला बचत गटामार्फत उद्योग सुरू करतात. कारण उद्योग, प्रशिक्षण, भांडवल उभारणी, विक्री व्यवस्था, यंत्रसामग्री, कच्चा माल, कर्जफेड इत्यादी विषयी सल्ला मार्गदर्शन गटामार्फत मिळते. त्यामुळे त्यांचे बसलीकरण होते. सुवर्णा गोखले यांच्या मते महिला सबलीकरणत उद्योग व्यवसायाचा सहभाग महत्त्वपूर्ण असतो. उद्योजगता विकासातून व्यक्ती विकास होतो. उद्योगातून कौशल्ये विकसित होतात, त्याामुळे महिला अडचणीवर मात करतात व अधिक सक्षम बनतात. उद्योगामुळे महिलांचे धाडस वाढते, महिला उद्योग सुरू करून जोखीम पत्करतात म्हणजे जोखीम घेण्याचं धाडस वाढते, मनोबल वाढते, विमा काढतात, बॅकांशी व्यवहार करतात, उद्योगामुळे आपण उत्पन्न मिळवीत असल्याची भावना निर्माण होते. त्यामुळेच आत्मविश्वास वाढतो. उद्योगाच्या माध्यमातून अनेक लोकांशी संपर्क येतो. संकोच कमी होतो, माहिती व ज्ञान वाढते, विचार करण्यास महिला समर्थ होतात. म्हणजेच महिलांचे उद्योगामुळे आर्थिक सबलीकरण होते.[1]

## महिलांचे सामाजिक सबलीकरण

समाजातील चालीरीती, रूढी परंपरा यामुळे महिलांचे सामाजिक खच्चीकरण होते. मात्र बचत गट चळवळीमुळे महिलांचे सामाजिक सबलीकरण होते. गटामुळे महिला एकत्र येऊ लागल्या. गावातल्या चावडीवर एकत्र येऊन गावप्रश्नांवर चर्चा करू लागल्या. गावातल्या देवळात सभा घेऊ लागल्या, गटामुळे स्त्री–पुरुष समानता प्रस्थापित होऊ लागली. गटामुळे अत्याचार, हुंडाबळी या कुप्रथांना आळा बसू लागला. स्त्रिया साक्षर होऊ लागल्या, जाणीव जागृती होऊ लागली, विचारांची देवाण घेवाण होऊ लागली, दबावगट निर्माण होऊ लागला, महिला प्रश्नासंबंधी मोर्चा, आंदोलने होऊ लागली. म्हणजे सामाजिक सबलीकरण होण्यास गटामुळे मदत झाली. समाजातील रूढी परंपरा धर्म इत्यादी बेड्यांनी महिला जखडल्या गेल्या. त्यामुळे त्यांचे

खच्चीकरण होऊ लागले. या बेड्यांमधून मुक्त होणे म्हणजेच स्त्रीचे सामाजिक सबलीकरण होय. गावाच्या चावडीवर, देवळात सभा घेऊन गाव प्रश्नांवर महिला चर्चा करू लागल्या. मुलीच्या लग्नासाठी कर्ज काढतात, मुलींना चांगले शिक्षण देऊन मुलींना स्वावलंबी करण्याचा प्रयत्न करतात. यातून महिलांचे सामाजिक सबलीकरण झालेले दिसते.[2]

**महिलांचे राजकीय सबलीकरण**

महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे संघटन होते, महिला संघटित झाल्या म्हणजे त्यांना ग्रामसभेत सहभागी होण्यासाठी आत्मविश्वास निर्माण होतो आणि ग्रामसभेत घेतलेल्या निर्णयांची दखल ग्रामपंचायतीला घ्यावी लागते. आता तर महिला धोरणात महिला ग्राम सभा घेण्याचा निर्णय झाला आहे. महिलांचा ग्रामसभेत सहभाग वाढविल्याशिवाय महिलांच्या राजकीय सहभागाचा उपयोग होणार नाही, म्हणजेच महिलांच्या राजकीय सबलीकरणाचे माध्यम बचत गट हे आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवरील महिला सबलीकरणाचे प्रयत्न

जगातल्या सर्व स्त्रियांचे प्रश्न आणि स्त्रियांचे दुय्यम स्थान हे जवळजवळ सारखेच आहे. देशाची विकासाची पातळी वेगवेगळी असली तरी स्त्रियांचे प्रश्न मात्र जवळजवळ सारखेच आहेत. काही मोजक्या देशातील स्त्रियांचे स्थान कसे आहे याचा आढावा घेण्यात आला आहे.[3]

**भारतातील महिला सबलीकरणाचे प्रयत्न**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारत सरकारने महिला विकासासाठी, महिला सबलीकरणासाठी, स्त्री–पुरुष समानतेसाठी निश्चित प्रयत्न केले आहेत.

**घटनात्मक हमी**

26 जानेवारी 1950 पासून भारतीय राज्यघटना अंमलात आली. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे यानुसार स्त्रियांना काही हक्क आणि विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत. कलम 14 प्रमाणे स्त्रिया व पुरुष यांना राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात अधिकार व संधी यांची हमी, कलम 15 प्रमाणे कोणत्याही नागरिकाबाबत धर्म, वंश, जात, लिंग इत्यादीमुळे भेदभाव केला जाणार नाही. कलम 15–अ नुसार स्त्रियांची अप्रतिष्ठा होईल असे कोणतेही कृत्य होऊ न देण्याचे प्रत्येक नागरिकांचे मुलभूत कर्तव्य आहे. कलम 15 (3) प्रमाणे राज्यांना स्त्रियांसाठी अनुकूल तरतूद करण्याची मान्यता. कलम 16 प्रमाणे सार्वजनिक क्षेत्रात नियुक्तीच्या वेळी सर्व नागरिकांना समान संधी. कलम 39 (अ) नुसार राज्य सरकारांनी धोरण तयार करतांना स्त्री पुरुष नागरिकांना उपजीविकेसाठी साधन मिळविण्याचा हक्क, कलम 39 (क) समान कामाला समान वेतन. कलम 42 नुसार राज्यातील नागरिकांना काम करण्यायोग्य वातावरण व नियम घालून दिले पाहिजेत.[4]

**पंचवार्षिक योजना आणि स्त्रियांच्या सबलीकरणाचे प्रयत्न**

पहिल्या पंचवार्षिक योजनेत स्त्रियांच्या प्रश्नांबाबत, स्वयंसेवी संस्थाद्वारे केंद्रीय समाज कल्याण बोर्डाने काही कल्याणकारी उपाययोजना करण्यास सुरूवात केली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत कल्याणकारी योजनांच्या व्यवथित अंमलबजावणीस मदत व्हावी या हेतूने महिला मंडळाच्या स्थपनेला चालना देण्यात आली. तळागाळापर्यंत असे महिला गट स्थापन करण्याचे प्रयत्न झाले. तिसऱ्या, चौथ्या आणि काही तात्पुरत्या स्वरूपाच्या कालखंडात स्त्रियांच्या शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले. स्त्रिया व बालकांचे आरोग्य यांची काळजी घेणाऱ्या सेवांमध्ये सुधरणा केल्या. भावी माता, नवप्रसूता आणि मुले यांना पूरक अन्न देण्याच्या योजना अंमलात आणल्या. पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या कालखंडात दृष्टिकोन बदलून कल्याण ऐवजी विकास संकल्पना मान्य केली गेली. कारण समाज कल्याणाची व्याप्ती कुटुंबाचे प्रश्न आणि स्त्रीची त्यामधील भूमिका यापर्यंत वाढविण्यात आली. सहाव्या पंचवार्षिक योजनेत स्त्री विकासाला प्राधान्य, आरोग्य, शिक्षरण रोजगार, यावर भर देण्यात आले. सातव्या योजनेत स्त्रियांना राष्ट्रीय विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी, त्यांचा आर्थिक व सामाजिक दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले. लाभधारकभिमुख कार्यक्रम हे यातील एक महत्त्वाचे पाऊल ठरले. त्यामुळे स्त्रियांना योजनांचा थेट लाभ उठविता आला. आठव्या पंचवार्षिक योजना कालखंडात महिलांना विकास कार्यक्रमांमुळे होणाऱ्या लाभांपासून वंचित ठेवण्यात येणार नाही. शिक्षण, आरोग्य, रोजगार या कार्यक्रमाद्वारे महिलांचा फायदा होईल याकडे लक्ष देण्याचे ठरविले. विकास प्रक्रियेत स्त्रिया बरोबरीने सहभागी होतील या दृष्टिकोनामुळे स्त्रियांना विकासाकडून सबलतेकडे नेण्यास मदत होईल. नवव्या पंचवार्षिक योजनेत सामाजिक बदल व आर्थिक विकासासाठी महिलांचे सबलीकरण हे उद्दिष्ट ठरविण्यात आले. महिलांना स्वावलंबी करण्यावर भर देण्यात आला. हे सर्व करण्यासाठी महिला बचत गटावर भर देण्यात आला. दहाव्या पंचवार्षिक योजनेत 2001 च्या महिला सबलीकरणासाठी राष्ट्रीय धोरणाच्या माध्यमातून महिला सबलीकरण करण्याचे उद्दिष्ट ठरविले. महिला व मुलांच्या विकासाला प्राधन्य दिले. अकराव्या योजनेत स्त्रियांच्या शिक्षणाला, स्त्री साक्षरतेला महत्त्व देण्यात

**ISSN:-** 2230-7850

आले. लिंगभेदभाव याकडे विशेष लक्ष महिला वर्ग आर्थिक, राजकीय, सामाजिकदृष्ट्या सक्षम व्हावा म्हणून उपयुक्त व साहाय्यक वातावरण निर्माण करण्याचे निश्चित करण्यात आले.[5]

**संदर्भसूची**

1. गोखले सु., ***महिला सबलीकरणत उद्योग व्यवसायाचा सहभाग***, निरंतर शिक्षण, जानेवारी 2006, पृ. 83–85.
2. दासगुप्ता ली. आणि इतर, ***महिलांचे सबलीकरण,*** दारिद्र्य निर्मूलन व स्वयंसाहाय्य गट, नाशिक, पृ.46–47.
3. तुरकर चं., ***महिला सक्षमीकरण : जाणवी व जागृती***, यशदा, यशमंथन, मार्च 2002, पृ. 53.
4. महाराष्ट्र राज्य महिला आयोग अहवाल, मुंबई, ***महाराष्ट्रातील स्त्रियांचा दर्जा,*** वस्तुस्थितीचे विश्लेषण, 1981–85, परिशिष्ट 1, पृ. 267.
5. आपटे ज. श., ***उपरोक्त,*** पृ. 105–107.



**अनिल माणिकराव बैसाणे**
इतिहास विभाग प्रमुख,
झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .